स्मार्ट मित्र-मैत्रिणींनो,

महाराष्ट्रात गेले दोन आठवडे विचित्र हवामान अनुभवायला मिळत आहे. खरं तर आता नोव्हेंबर महिना जवळजवळ संपला आहे. तरीसुद्धा थंडीचा जम बसलेला नाही. काही दिवस थंडी पडते. मग काही दिवसांनी पुन्हा ढग येतात व थंडी पळून जाते. आतासुद्धा महाराष्ट्राच्या अनेक भागात ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यात तरी सलग थंडी पडणार का? असेच वाटू लागले आहे. अशाप्रकारे थंडी न पडण्याचा शेतीवरही परिणाम होतो. त्यामुळेच असे बदल आपल्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत व त्यावर काळजीपूर्वक लक्ष ठेवायला हवे. म्हणूनच थंडी कधी पडते आणि किती दिवस कायम राहते, यावर आपलेसुद्धा लक्ष राहू द्या. त्यात काही बदल आढळले तर ते आम्हालासुद्धा सांगा. गाथेबाबतच्या आपल्या प्रतिक्रियासुद्धा पाठवा. त्यासाठीचा पत्ता लिहून घ्या- **लोकसत्ता, ३/११, अरोरा टॉवर्स, ९ ए मोलेदिना रोड, लष्कर, पुणे-** ४११००१ (पत्राच्या पाकिटावर 'गाथा ज्ञानाची' असे आवर्जून लिहा)
किंवा पुढील ॲड्रेसवर ई-मेल करा-
loksattagatha2008@gmail.com
(गाथेच्या ७० ते ७५ भागांची उत्तरे पुढीलप्रमाणे-)

प्रश्न ७०. कार्बन वायूंचे वातावरणातील वाढते प्रमाण रोखण्यासाठी पर्यायी ऊर्जास्रोत विकसित करण्याची गरज आहे का?
उत्तर- होय.

प्रश्न ७१. हवामानबदलाबाबत भूमिका घेताना वेगवेगळे देश पृथ्वीचा विचार करतात की स्वतःच्या देशाचा?
उत्तर- स्वतःच्या देशाचा.

प्रश्न ७२. ग्लोबल वॉर्मिंग व हवामानबदलाचा युरोपवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे का?
उत्तर- होय.

प्रश्न ७३. जगातील इतर लोकांच्या तुलनेत कोणत्या देशाचे नागरिक जास्त नैसर्गिक साधनसंपत्ती वापरतात?
उत्तर- अमेरिका.

प्रश्न ७४. भारत व चीनसारख्या देशांना हवेत कार्बन वायू सोडण्यावर बंधने का नको आहेत?
उत्तर- देशातील लोकांचे राहणीमान उंचावण्यासाठी.

प्रश्न ७५. मोठे देश पर्यावरणाचे नुकसान करत असल्याचा त्रास लहान देशांना होत आहे का?
उत्तर- होय.

MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
प्रस्तुत
लोकसत्ता गाथा ज्ञानाची

कागदी पिशव्यांच्या वापर करा आणि पर्यावरणाचा समतोल राखा

प्लॅस्टिकला हद्दपार करा

हस्तकलेच्या सहाय्याने कालबाह्य झालेल्या कागदाच्या पिशव्या वापरात आणा ज्या पर्यावरणाचे संरक्षण करतील.

MAHARASHTRA
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
Website: http://mpcb.mah.nic.in